Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume2, Issue.9, Oct. 2012
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# रामलिंग धार्मिक पर्यटन केंद्राचा भौगोलिक अभ्यास जि. उस्मानाबाद ;महाराष्ट्र

**सुर्यवंशी एस्.पी , सोनवणे एस्.व्ही.**

[1]भूगोल विभाग,नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमस,कोल्हापूर ;महाराष्ट
[2]भूगोल विभाग,शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा, जि. उस्मानाबाद्र

***सारांश :***

पर्यटन उद्योगातून मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो व त्यातून आर्थिक विकास साध्य होतो. अलिकडील काळात पर्यटनाला अधिक संधी मिळत असून त्या दृश्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराश्ट्रातील उस्मानाबाद हा जिल्हा देखील पर्यटन दृश्टया महत्वपूर्ण आहे. या जिल्हयातील रामलिंग देवस्थान व आजुबाजूचा प्रदेश हा पर्यटकांना आकर्शित करतो. रामलिंग देवस्थानला लाभलेला धार्मिक, नैसर्गिक वारसा पाहता हे पर्यटन केंद्र दुर्लक्षित राहिले आहे. त्यामुळे या शोध निबंधासाठी 'रामलिंग धार्मिक पर्यटन केंद्राचा भौगोलिक अभ्यास' हा विशय निवडला आहे.

**बीज संज्ञा :–**

धार्मिक, नैसर्गिक, पर्यटन केंद्र, पर्यटन विकास.

**प्रस्तावना :–**

रामलिंग देवस्थान हे उस्मानाबाद जिल्हयातील नैसर्गिक सानिध्यातील असलेले पर्यटन केंद्र असून या स्थळाला लाभलेले महत्व हे पर्यटकांना आकर्शित करते. बालघाट डोंगर रांगेतील रामलिंग तसेच दुर्गादेवी मंदिर, धबधबे, पशु–पक्षी, नैसर्गिक वनक्षेत्र, गुरूकुल हे देखील पर्यटकांना साद घालतात. या रामलिंग देवस्थानची मानाची यात्रा मार्गशीर्श शुध्द चतुर्थी, पंचमी व शश्ठीला भरते. या यात्रेत विविध धार्मिक कार्यक्रम होतात. तसेच श्रावण महाशिवरात्रीला येथे पर्यटकांची प्रचंड गर्दी असते. या काळापुरती मंदिरापर्यंत बससेवा उपलब्ध असते. येथे पर्यटकांना धार्मिक कार्याबरोबरच नैसर्गिक घटकाचा आनंद घेता येतो. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे.

**उद्देश :–**

रामलिंग पर्यटन केंद्राचा धार्मिक, भौगोलिक दृश्टया अभ्यास करून महत्व विशद करणे, पर्यटन केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध पर्यटन सुविधा, त्याच्या समस्या जाणून घेऊन विकासासाठी उपाय सुचविणे तसेच उस्मानाबाद जिल्हयातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांची ओळख करून देणे हे या शोधनिबंधाचे उद्देश आहेत.

**अभ्यास क्षेत्र :–**

बालाघाट डोंगर रांगेतील उस्मानाबाद पासून 22 कि.मी. वर येडेशी नावाचे स्थानक असून येथून केवळ 3 कि.मी. अंतरावर रामलिंग हे देवस्थान आहे. जवळ जाईपर्यंत नजरेच्या टप्प्यात न येणारे, निसर्ग रम्यतेने मानवी मन लोभविणारे, प्रदूशण मुक्त हे स्थान आहे. या स्थळाचा भौगोलिक विस्तार 180,16′, ते 180 20′ अक्षांस उत्तर ते पूर्व 650, 54′ ते 650, 89′ असे असून वार्शिक पर्जन्यमान 500 मि.मी. इतके आहे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :–**

या शोधनिबंधासाठी प्राथमिक व द्वितीय सामुग्रीचा उपयोग केला आहे. प्राथमिक माहितीचे संकलन प्रत्यक्ष केंद्रावर जाऊन मिळविले. तसेच पर्यटकांची मते जाणून घेतले. द्वितीय सामुग्री विविध ग्रंथ, शासकीय कार्यालय इत्यादी याद्वारे प्राप्त करण्यात आले. उपलब्ध झालेल्या माहितीचे योग्य संस्करण करून विश्लेशण केले आहे.

**विषय विवेचन :–**

रामलिंग मंदिर हेमाडपंथी असून गाभाराही तितकाच आकर्शक आहे. मंदिराच्या पुढे नंदी, बाजूस ओवऱ्या, परिक्रर्मा मार्ग, आकर्शक शिखर असे या मंदिराचे स्वरूप आहे. संपूर्ण मंदिर सुस्थितीत आज देखील पाहावयास मिळते. मंदिराचा परिसर भव्य असून मंदिराच्या तिन्ही बाजूस वाहते पाणी असते. या मंदिराविशयी अशी आख्यायिका सांगितली जाते की, सीतेच्या शोधात प्रभू श्री रामचंद्रजी पूजेसाठी लिंगाची स्थापना केली म्हणून भगवान शंकर येथे रामलिंग या नावाने विख्यात झाले. या मंदिराची दुरूस्ती रामदेवराय यादव या राजाने केल्याचा उल्लेख आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे हे शिवभक्त होते. मुलुखगिरीत त्यांचा मुक्काम रामलिंग येथे झाला होता. त्यावेळी त्यांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केल्याचे सांगण्यात येते. असे महत्व या स्थानाला लाभलेले आहे. पर्यटकांना या ठिकाणी नदी प्रवाह, डोंगर रांगा, वनराई, धबधबे, खोल दरीतील मंदिर परिसर, निरस्तापासून थोडीशी शांतता हे सारे काही रामलिंग येथे एका ठिकाणी मिळून जाते. या मंदिर परिसरात मोठया संख्येने माकडे असून त्यांच्या अनेक मर्कटलीला पर्यटकांना पाहायला मिळतात. रामलिंग देवस्थान धार्मिक पर्यटन केंद्र असले तरी त्याला नैसर्गिक स्थळ म्हणून देखील तितकेच महत्व आहे.

**रामलिंग परिसरातील प्रेक्षणीय स्थळे :–**

**1) दुर्गादेवी मंदिर :**

**Please cite this Article as :सुर्यवंशी एस्.पी , सोनवणे एस्.व्ही.,रामलिंग धार्मिक पर्यटन केंद्राचा भौगोलिक अभ्यास जि. उस्मानाबाद ;महाराष्ट्र : Indian Streams Research Journal (Oct ; 2012)**

रामलिंग देवस्थानापासून जवळच एका टेकडीवर दुर्गादेवीचे छोटेसे मंदिर आहे. दुर्गादेवीच्या मंदिरावरूनच या टेकडीस दुर्गादेवी टेकडी म्हणून ओळखतात. येथून पर्यटकांना आजुबाजूचा नैसर्गिक परिसर पाहता येतो.

**2) गुरूकुल :**

बालाघाट डोंगर रांगेतील रामलिंग अभयारण्य परिसराची नोंद गुरूकुल संस्कृतीनेही घेतली आहे. 1984 मध्ये या परिसरात एक छोटेसे गुरूकुल सुरू करण्यात आले. प्राचीन संस्कृतीचे जतन करणारे हे गुरूकुल असून येथे संस्कृतचे शिक्षण दिले जाते. त्यांनी या परिसरात अनेक वनौशधीचे उत्पादन सुरू केले आहे. विविध वनौशधी वृक्षाची जोपासना केल्याने हा परिसर दाट वृक्षाने वेढलेला पहावयास मिळतो. येथे मध, मंजन व्यतिरिक्त काही औशध तयार करून योग्य दरात विक्रीसाठी उपलब्ध केले आहेत. केवळ निसर्ग दर्शन नव्हे तर वनौशधीच्या दृश्टीनेही हा परिसर महत्वपूर्ण आहे.

**3) धबधबे :**

मंदिराच्या मागील बाजूस एक धबधबा असून या धबधब्यास 'राम' असे नाव आहे. बाजूलाच एक गुंफा असून येथे भूमिगत पाण्याच्या कार्यातून निर्माण होणारा भूरूपासारखी भूरूपे पहावयास मिळते. हे स्थान भूगोल अभ्यासकांच्या दृश्टीने महत्वपूर्ण आहे. तसेच मंदिराच्या उजव्या बाजूस देखील एक धबधबा आहे. या धबधब्यास हरिणी या नावाने ओळखतात.

**4) रामलिंग घाट अभयारण्य :**

येडशी रामलिंग घाट अभयारण्य परिसरामध्येच रामलिंग हे देवस्थान आहे. रामलिंग परिसराला कायदेशीररित्या शासन निर्णय क्रमांक डब्ल्यु.एल.पी. 1904/प्र.क.513/फ 1 दि. 16 मे 1996 अन्वये अभयारण्य म्हणून घोशित केले आहे. या अभयारण्याचे वनक्षेत्र हे द. उश्णकटिबंधाय शुश्क पानझडी व काटेरी वनप्रकारात येते. येडेशी येथील रामलिंग अभयारण्य म्हणजे निसर्गसौंदर्याचा खजिनाच आहे. येथील विविध वृक्ष, पशु–पक्षी पर्यटकांना मंत्रमुग्ध करतात. या अभयारण्यात खैर, धावडा, लेडा, मिडशिंग, अर्जुनसायडा, सग, सलाईहिरव, अंजन, बोर, बाबुळ, वेल, आऱ्हाटी, वड, उंबर इ. वनस्पती आढळतात. तर पशु–पक्ष्यांमध्ये तरस, काळवीट, माकडे, कोल्हे, लांडगे, रानडुक्कर, हरिण, ससे, मोर, पोपट, सायाळ इ. पहावयास मिळतात. नैसर्गिक आदिवासात पशु–पक्ष्यांच्या मुक्त संचार हा पर्यटकांना साद घालत असतो. रामलिंग घाट अभयारण्यातील जैवसंपदा म्हणजे या भागाला लाभलेले नैसर्गिक वरदान असून पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी या नैसर्गिक घटकांचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

**पर्यटकांची संख्या :–**

रामलिंग देवस्थानला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्या संदर्भातली आकडेवारी ही रामलिंग देवस्थान समितीकडून प्राप्त केलेली असून ती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क. 1 रामलिंग येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या**

| अ.क. | कालावधी | पर्यटकांची संख्या |
|---|---|---|
| 1 | दररोज | 1,000 ते 1,500 |
| 2 | श्रावण महिन्यात दररोज | 2,000 ते 3,000 |
| 3 | श्रावण महिन्यातील सोमवार | 8,000 ते 10,000 |
| 4 | महाशिवरात्री | 10,000 पेक्षा जास्त |
| 5 | यात्रा | 80,000 पेक्षा जास्त |

**स्त्रोत : रामलिंग देवस्थान समिती**

या पर्यटन केंद्राला पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झाला नसला तरी येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या वरील तक्त्यावरून पाहिली तर ती अधिक अंशी आहे. येथील यात्रेला प्रचंड गर्दी पडत असून या काळात सुविधा उपलब्ध नसल्याने पर्यटकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी शासनाने पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त करून देऊन सोयी–सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. विविध सोयी–सुविधा निर्माण झाल्या तर पर्यटकांना आकर्शित करता येईल तसेच स्थानिक लोकांना रोजगार देखील प्राप्त करून देता येईल.

**समस्या व उपाययोजना :–**

रामलिंग देवस्थानच्या ठिकाणी पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या कसल्याच प्रकारच्या सोयी–सुविधा उपलब्ध नाहीत. प्रामुख्याने वाहतुक सुविधेची येथे पर्यटकांना समस्या जाणवते. येडेशी पासून रामलिंग देवस्थानापर्यंत दर तासाला बस सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. तसेच भक्त निवास, हॉटेल ;उपहारगृहद्ध, प्रसादालने, दुकाने, स्नानगृह, शौचालये इत्यादींची निर्मिती करणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. या विविध सुविधेच्या प्राप्तीतून स्थानिक लोकांनाही रोजगार उपलब्ध होईल. प्रामुख्याने या पर्यटन केंद्राची फारशी प्रसिध्दी झालेली नाही. यासाठी विविध प्रसिध्द माध्यमाची मदत घेऊन पर्यटन केंद्राचा प्रसार करावा. या उपाययोजनाच्या पूर्ततेतून निश्चितच हे पर्यटन केंद्र विकसित पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्दीस येण्यास वेळ लागणार नाही.

**निष्कर्श :–**

रामलिंग पर्यटन केंद्राला धार्मिक, नैसर्गिक महत्व प्राप्त झालेले असून येथील रामलिंग देवस्थानाशिवाय दुर्गादेवी मंदिर, गुरूकुल, धबधबे, अभयारण्य हे देखील पर्यटकांना आकर्शित करतात. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. असे असले तरी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या स्थळाचा विकास झालेला नाही. त्यासाठी प्रशासनाने वरील सुचविलेल्या विविध उपाययोजना करून पर्यटन स्थळाचा विकास करावा. परंतु विकास साधत असताना नैसर्गिक पर्यावरणाला हानी पोहचणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :–**

1)महाराष्ट्र राज्य गॅझेटर, उस्मानाबाद जिल्हा (1981).
2)शर्मा के.के. (2005) संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हा एक दृष्टिकोन, इंटलेकच्युअल बुक ब्युरो, भोपाळ.
3)भारत गजेंद्रगडकर (2003) बालाघाटाची साद, रसिक प्रकाशन, उस्मानाबाद.
4)प्रा. आजबे आर. एम. (2010) निझर्णेश्वर धार्मिक केंद्राचा एक भौगोलिक अभ्यास महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका.
5)डॉ. सुर्यवंशी एस्. पी. (2009) 'उस्मानाबाद जिल्हयातील पर्यटन स्थळांच्या विकासाचा भौगोलिक अभ्यास' अप्रकाशित पीएच्.डी. प्रबंध, डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✶Google Scholar
- ✶EBSCO
- ✶DOAJ
- ✶Index Copernicus
- ✶Publication Index
- ✶Academic Journal Database
- ✶Contemporary Research Index
- ✶Academic Paper Databse
- ✶Digital Journals Database
- ✶Current Index to Scholarly Journals
- ✶Elite Scientific Journal Archive
- ✶Directory Of Academic Resources
- ✶Scholar Journal Index
- ✶Recent Science Index
- ✶Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net